# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.महिला व बालकल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - ७
## सभावृत्तांत

दिनांक- १३/१/२०१० वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १३/१/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.लोखंडे सुजाता सुनिल - सभापती
२. मा.सौ.गावडे सुषमा गोविंद
३. मा.भारती ज्योती सुखलाल
४. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
५. मा.उबाळे वैशाली संजय
६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
७. मा.फुगे सुनंदाताई विजय

याशिवाय मा.चाकणकर- उपनगरसचिव, मा.जगताप - समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले-

विषय क्रमांक - २) पिं.चिं.मनपा क्षेत्रातील मुलींना तांत्रिक प्रशिक्षणाकामी अर्थसहाय्य देणेबाबत..

विषय क्रमांक - ३) पिं.चिं.मनपा क्षेत्रातील वैद्यकिय / अभियांत्रिकी संगणक प्रथमवर्ष पदवी परीक्षा या सारखे उच्चशिक्षण घेणा-या युवतींना अर्थसहाय्य देणेबाबत..

विषय क्रमांक - ४) वॉर्ड क्र.६ गणेश नगर येथे महिलांसाठी अत्याधुनिक सुसज्ज व्यायामशाळा बांधणेबाबत.. मा.अलकाताई यादव, मा.वैशाली उबाळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ५) अभ्यास दौ-यासाठी येणा-या खर्चाबाबत..मा.सुषमा गावडे,मा.अलकाताई यादव यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक - ६) नाशिक व नवीमुंबई महानगरपालिका दौ-यासाठी येणा-या खर्चाबाबत..मा.सुनंदाताई फुगे,मा.अलकाताई यादव यांचा प्रस्ताव..

दिनांक ९/१२/२००९ व १८/१२/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक- १६ विषय क्रमांक- १
दिनांक- १३/१/२०१० विभाग- नागरवस्ती विकास योजना
सूचक- मा.सुनंदाताई फुगे अनुमोदक- मा.सुषमा गावडे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/६/कावि/१६७७/०९ दि.२६/१०/०९
विषय- मे.मॅक्स टेलीकॉम एज्युकेशन सोसायटी (एम.टेल) पुणे या संस्थे मार्फत प्रशिक्षण देणेबाबत...

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले</u>-

ठराव क्रमांक- १७ विषय क्रमांक- २
दिनांक- १३/१/२०१० विभाग :- नागरवस्ती विकास योजना
सूचक- मा. ज्योती भारती अनुमोदक- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/५/कावि/१८/२०१० दि.११/१/२०१०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील यो.क्र.०३ मुलींना तांत्रिक प्रशिक्षणाकामी अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे ०६ पात्र लाभार्थींना प्रत्येकी र.रु.२,०००/- प्रमाणे एकत्रित र.रु.१२,०००/- अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १८ विषय क्रमांक- ३
दिनांक- १३/१/२०१० विभाग :- नागरवस्ती विकास योजना
सूचक- मा.ज्योती भारती अनुमोदक- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/५/कावि/१९/२०१० दि.११/५/२०१०

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील यो.क्र.१६ इयत्ता १२ वी नंतरचे वैद्यकिय (M.B.B.S)अभियांत्रिकी संगणक प्रथम वर्ष पदवी परीक्षा यासारखे उच्चशिक्षण घेणा-या युवतींना अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ प्रमाणे ०८ पात्र लाभार्थींना प्रत्येकी र.रु.७,५००/- प्रमाणे एकत्रित र.रु.६०,०००/- अर्थसहाय्य अदा करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास आणि अपात्र लाभार्थींकडुन पुर्तता करुन घेवुन त्यांनाही या योजनेअंतर्गत लाभ देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- १९ विषय क्रमांक- ४
दिनांक- १३/१/२०१०
सूचक- मा.अलकाताई यादव अनुमोदक- मा.वैशाली उबाळे
संदर्भ- मा.अलकाताई यादव,मा.वैशाली उबाळे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.६ गणेशनगर चिखली येथे पाटीलनगर येथे महिलांसाठी अत्याधुनिक सुसज्ज व्यायामशाळा बांधण्यात यावी. सदर कामासाठी महिला बालकल्याण समितीतुन रक्कम रुपये पन्नास लाख ची तरतुद करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- २० विषय क्रमांक- ५
दिनांक- १३/१/२०१०
सूचक- मा.सुषमा गावडे अनुमोदक- मा.अलकाताई यादव
संदर्भ- मा.सुषमा गावडे,मा.अलकाताई यादव यांचा प्रस्ताव -

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व मुलांसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. तथापि महाराष्ट्राबाहेरील इतर राज्यांमध्ये देखील महिलांसाठी व मुलांसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात तसेच महिला सक्षमीकरणाचे काम देखील चांगल्या प्रकारे केले जाते. या विविध योजना व महिला सक्षमीकण उपक्रम यांची माहिती घेण्याच्या हेतूने महिला बालकल्याण समितीचे सर्व सदस्य व सभापती तसेच नागरवस्ती विभागाचे दोन अधिकारी राजस्थान राज्यातील जोधपुर, जयपुर,उदयपुर महापालिकांना भेट देणार आहेत तरी या

अभ्यास दौ-यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- २१ विषय क्रमांक- ६

दिनांक- १३/१/२०१०

सूचक- मा.सुनंदाताई फुगे अनुमोदक- मा.अलकाताई यादव

संदर्भ- मा.सुनंदाताई फुगे,मा.अलकाताई यादव यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. तथापि इतर महानगरपालिकांमध्ये कोणत्या योजना राबविण्यात येतात याची माहिती घेण्याच्या हेतुने मा.महिला बाल कल्याण समिती सभापती व समितीचे सर्व सदस्य तसेच नागरवस्ती विकास योजना विभागाचे दोन अधिकारी नाशिक महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका येथे भेट देणार असल्याने या दौ-यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(सुजाता सुनिल लोखंडे)
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक- नस/९/कावि/ ६८ /१०
दिनांक- १५ /१/२०१०

सही/-
उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.